# महाराष्ट्र शासन

## लेखाधिकारी, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- aohekrp@gmail.com / jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.: लेखाधिकारी/उशि/कोविप/२०१६/29 दि. 30/11/2016

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
सर्व अधिनस्त शासकीय अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित (टप्पा अनुदानावरील)
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः ई.बी.सी. सवलतीकरीता विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी अंतिम मुदतवाढ मिळालेबाबत...**

संदर्भः १. या कार्यालयाकडून दि.२०.१०.२०१६ रोजी ई-मेलव्दारे पाठविण्यात आलेले मा.संचालनालयाचे परिपत्रक क्र. उशिसं/ई.बी.सी.सवलत/शिष्य./२०१६/, दि.२०.१०.२०१६
२. मा.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/ई.बी.सी.सवलत/शिष्य./२०१६/१२७३३, दि.०८.११.२०१६
३. मा.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/ई.बी.सी.सवलत/१४अई/१३४६६, दि.३०.११.२०१६

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सदर सवलत योजना ऑनलाईन पदधतीने राबविण्यात येत आहे. याबाबत मा. संचालनालयाकडून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या कालावधीमध्ये **दि.०४.१२.२०१६ पर्यंत अंतिम मुदतवाढ** देण्यात आलेली आहे.

तरी सदर योजनेच्या मुदतवाढीचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळावा याहेतूने सर्व महाविद्यालयांकडून दि.०१.१२.२०१६ ते ०२.१२.२०१६ या कालावधीमध्ये सदर योजनेबाबत विशेष मोहिम राबविण्यात यावी. तसेच सदर योजनेपासून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही याची काळजी घेण्यात यावी. जर कोणी लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

**महत्वाच्या सूचना**

१. जर एखाद्या विद्यार्थ्याने अर्जात भरलेली माहिती चूकीची दिसून येत असेल व ती आपले स्तरावरुन **Edit** होत नसेल तर सदर अर्ज थेट **Reject** न करता **Defect** मध्ये टाकून सदर विद्यार्थ्यास ती चूक सुधारण्याची संधी देण्यात यावी. तद्‌नंतर सदर विद्यार्थ्याने ती चूक दुरुस्त केल्यास तो अर्ज पुनश्चः आपले स्तरावरुन तपासणी करुन **Verify** करण्यात यावा.
२. या योजनेकरीता अर्ज करतांना विद्यार्थ्यांची कोणतीही कागदपत्रे या कार्यालयास जमा करावयाची नसल्याने या कार्यालयामार्फत केली जाणारी अर्जांची तपासणी ही केवळ आणि केवळ महाविद्यालयांनी / संस्थांनी केलेल्या तपासणीच्या आधारे होत असल्याने महाविद्यालय / संस्था यांचेकडून सदर शिष्यवृत्तीचे अर्जांची तपासणी काळजीपूर्वक व जबाबदारीने करण्यात यावी. अन्यथा भविष्यात काही चूकीची माहिती उघड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य, महाविद्यालय / संस्था यांची राहील याची नोंद घ्यावी.

30/11/2016
लेखा अधिकारी,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रत माहितीस्तवः
१. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
२. मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल, जि.रायगड.